श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित,

# यशवंत महाविद्यालय (कनिष्ठ), नांदेड

# अकरावी कला,वाणिज्य व विज्ञान प्रवेश प्रक्रिया—२०२०—२०२१

कोरोना(COVID-19)च्या वाढत्या प्रार्दुभावामुळे शासनाच्या आदेशानुसार २०२०—२०२१ शैक्षणिक वर्षासाठी महाविद्यालयात कला, वाणिज्य व विज्ञान शाखेसाठी ऑनलाईन प्रवेश सुरू होत आहेत. मा.शिक्षण उपसंचालक,लातूर यांनी घालून दिलेल्या नियमाप्रमाणे आमच्या महाविद्यालयात खालील प्रमाणे संख्या मर्यादित असून विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नांवनोंदणी केल्यानंतर गुणवत्तेनुसार ऑनलाईन प्रवेश देण्यात येईल. तरी हुशार व होतकरू विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नांव नोंदणीसाठी त्वरा करावी. वर्गनिहाय विद्यार्थी प्रवेश क्षमता खालील प्रमाणे आहे.

**अकरावी कला, विज्ञान व वाणिज्य वर्गासाठी ऑनलाईन नांव नोंदणी महाविद्यालयाचे संकेतस्थळ www.ymnnanded.in हे असुन याच संकेतस्थळावर प्रवेश प्रकियेच्या सर्व याद्या उपलब्ध होतील**

| | | |
|---|---|---|
| १ | प्रवेश नोंदणी अर्ज शेवटी दिनांक | दि.१५.८.२० —सायं ०५.३० पर्यंत |
| २ | चेक लिस्ट (संकेतस्थळावर प्रसिध्द करणे) | दि.१८.०८.२०—दुपारी ०२.०० वा. |
| ३ | चेक लिस्ट मधील चूकांची दुरूस्ती (ऑनलाईन) **helpdeskymnjr@gmail.com** या ई—मेल वर दुरूस्ती पुराव्यासहीत पाठवावे | दि.१८.०८.२० — दुपारी ०३.०० नंतर दि.१९.०८.२० —सायं ०५.३० पर्यंत |
| ४ | आरक्षण व गुणवत्तेनुसार प्रथम निवड यादी | दि.२०.०८.२०— सकाळी ११.०० वा. |
| ५ | प्रथम निवड यादीतील प्रवेश निश्चित करणे | दि.२०.०८.२० — सकाळी ११.०० ते दि.२१.०८.२० — सायं ०५.३० पर्यंत |
| ६ | आरक्षण व गुणवत्तेनुसार द्वितीय निवड यादी | दि.२४.०८.२०—सकाळी ११.०० वा. |
| ७ | द्वितीय निवड यादीतील प्रवेश निश्चित करणे | दि.२४.०८.२०—सकाळी ११.०० ते दि.२५.०८.२० —सायं ०५.३० पर्यंत |
| ८ | आरक्षण व गुणवत्तेनुसार तृतीय निवड यादी | दि.२६.०८.२०—सकाळी ११.०० वा. |
| ९ | तृतीय निवड यादीतील प्रवेश निश्चित करणे | दि.२६.०८.२०—सकाळी ११.०० ते दि.२७.०८.२० —सायं ०५.३० पर्यंत |
| १० | आरक्षण व गुणवत्तेनुसार प्रथम निवड यादी **(विनाअनुदानित)** | दि.२६.०८.२०—सकाळी ११.०० वा. |
| ११ | प्रथम निवड **(विनाअनुदानित)** यादीतील प्रवेश निश्चित करणे | दि.२६.०८.२०—सकाळी ११.०० ते दि.२७.०८.२० —सायं ०५.३० पर्यंत |
| १२ | आरक्षण व गुणवत्तेनुसार द्वितीय निवड यादी **(विनाअनुदानित)** | दि.२८.०८.२०—सकाळी ११.०० वा. |
| १३ | द्वितीय निवड **(विनाअनुदानित)** यादीतील प्रवेश निश्चित करणे | दि.२८.०८.२०—सकाळी ११.०० ते दि.२९.०८.२० —सायं ०५.३० पर्यंत |
| १४ | आरक्षण व गुणवत्तेनुसार तृतीय निवड यादी **(विनाअनुदानित)** | दि.३१.०८.२०— सकाळी ११.०० वा. |
| १५ | तृतीय निवड **(विनाअनुदानित)** यादीतील प्रवेश निश्चित करणे | दि.३१.०८.२०—सकाळी ११.०० ते दि.०१.०९.२० —सायं ०५.३० पर्यंत |
| १६ | आवश्यकता भासल्यास सरळ प्रवेश | दि.०२.०९.२०२० पासुन पुढे |

## अनुदानित/ विनाअनुदानित

**महत्वाची सूचना :**

१. अकरावी कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नांव नोदंणी महाविद्यालयाच्या उल्लेखित वेबसाईटवर दिलेल्या लिंकद्वारे जाऊन करावे. नांवनोंदणी शुल्क रू.२०/— व प्रवेश फॉर्म शुल्क व इतर कागदपत्रे रू.३०/— असे एकुण ५०/— रूपये दिलेल्या लिंकद्वारे एसबीआय ईपे चावापर करून भरण्यात यावे. याची संपूर्ण जबाबदारी पालक/विद्यार्थ्यांची राहील.

२. वाणिज्य शाखेत मराठी व इंग्रजी माध्यमासाठी वेगळी नांव नोंदणी करणे अनिवार्य आहे.

३. ऑनलाईन नांव नोंदणी करून विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी अर्जासोबत ऑनलाईन मार्कमेमो व जातीच्या दाखल्याची सत्यप्रत (संवर्गात असल्यास) तसेच स्वातंत्र्य सैनिक किंवा माजी सैनिक किंवा धरणग्रस्त यांच्या पाल्यांनी नांव नोंदणी अर्जासोबत संबंधित प्रमाणपत्राची प्रत अपलोड करणे आवश्यक आहे तसेच अपंग विद्यार्थी असल्यास किंवा विद्यार्थ्याचा क्रिडा क्षेत्रात राज्य व राष्ट्रीय स्तरावर सहभाग असल्यास प्रमाणपत्राची प्रत अपलोड करण्यात यावी.

४. **विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नांवनोंदणी उल्लेखित वेबसाईटवर दिलेल्या लिंकद्वारे करीत असतांना काळजीपुर्वक नांव नोंदणी अर्जावर अचूक मोबाईल क्रमांक व ईमेल लिहीणे अनिवार्य आहे.**

५. प्रवेश घेतना विद्यार्थ्यांनी मूळ टी.सी.,मूळ मार्क मेमो तसेच टी.सी,मार्क मेमो, जातीचे प्रमाणपत्र (आरक्षित संवर्गासाठी) व आधार कार्ड यांच्या प्रत्येकी तीन सत्यप्रती प्रवेश अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

६. सी.बी.एस.ई. किंवा इतर बोर्डाच्या विद्यार्थ्यांनी एच.एस.सी.बोर्डाने मागवलेली माहिती देणे बंधनकारक आहे.

७. विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांमधून इच्छुक विद्यार्थ्यांसाठी व्होकेशनल कोर्सेस (क्रॉप सायन्स, ॲनिमल सायन्स, फ्रेश वॉटर फिश कल्चर, कॉम्प्युटर सायन्स व इलेक्ट्रॉनिक्स) तसेच Agricultural Science & Techonology (क्रॉप प्रोडक्शन) या विषयामध्ये दि.२.९.२०२० रोजी गुणवत्ता व आरक्षण संवर्गानुसार प्रवेश होतील.

८. निर्धारीत दिलेल्या तारखेस व वेळेस प्रवेश घेणे विद्यार्थ्यांना बंधनकारक राहील. उशीरा आलेल्या विद्यार्थ्यास प्रवेश देणे बंधनकारक राहणार नाही. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थी/पालकांची असेल.

९. अनुदानित संवर्गनिहाय प्रवेश कोटा अंतर्गत प्रवेश संपल्यानंतर लगेच विनाअनुदानित संवर्गनिहाय प्रवेश कोटा अंतर्गत प्रवेश सुरू होईल.

सदरील सर्व प्रवेश प्रक्रियेस शासनाचे आरक्षणाचे सर्व नियम लागू राहतील. तसेच शासनाकडून व मा.न्यायालयाकडून वेळोवेळी येणाऱ्या सूचनेप्रमाणे प्रवेश प्रक्रियेत बदल करण्याचे अधिकार प्रशासनास राहतील.

**( डॉ.गणेशचंद्र एन.शिंदे )**
**प्राचार्य**